विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी १० लाख लोक येण्याची शक्यता; पाणी, वाहनसुविधेसह प्रशासन, पोलीस सज्ज

पुणे / प्रतिनिधी

पेरणे फाटा येथील विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी यावर्षी राज्यासह देशभरातून १० लाख लोक येण्याची शक्यता आहे. त्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून प्रशासन, पोलीस सज्ज आहेत. कायदा सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त लावला असल्याचे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सांगितले.

विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी गेल्या वर्षी सुमारे ८ लाख भाविक आले होते. यंदा त्यात वाढ होण्याची शक्यता असून १० लाख लोक येतील, अशी शक्यता गृहीत धरुन प्रशासनाने तयारी केली आहे. पुणे शहर व ग्रामीण पोलीस दलाचा चोख बंदोबस्त सोमवारपासून या परिसरात लावण्यात आला आहे.

पुणे शहर पोलीस दलाकडून ३ अपर पोलीस आयुक्त, १६ पोलीस उपायुक्त, ४५ सहायक पोलीस आयुक्त, १३२ पोलीस निरीक्षक, ४१४ सहायक पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक, ५०४३ पोलीस अंमलदार, १ हजार होमगार्ड, एस आर पी एफच्या ७ कंपन्या, बीडीडीएसची १८ पथके, क्युआरटीची ६ हिट, आर सी पी स्ट्रायकिंग ५ असा मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले असून त्याशिवाय २ मोबाईल सर्वेलन्स वाहने बंदोबस्ताकरीता मागविण्यात आली आहेत. देशभरातून वेगवेगळ्या मार्गाने विजयस्तंभाकडे अभिवादनासाठी येणार्या लोकांचे वाहनांसाठी सर्व मार्गावर पुरेशी दुचाकी व चारचाकी वाहन पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे. पार्किंग स्थळापासून विजयस्तंभाजवळ जाण्यासाठी मोफत बसेसची व्यवस्था करण्यात आलेली आहे. विजयस्तंभ परिसरात गर्दी मोठ्या प्रमाणात होत असल्याने पोलीस मदत केंद्रे व वॉच टॉवर्स बसविण्यात आलेले आहेत. अभिवादन सोहळा कार्यक्रम शांतता व सुव्यवस्थेत पार पडावा, यासाठी जातीय द्वेष पसरविणारे संदेश असलेले बॅनर, होर्डिंग लावण्यास बंदी घालण्यात आली आहे. विजयस्तंभ परिसरात कोणतेही फटाके स्वैरपणे उडविणे किंवा दारु काम करणे किंवा फेकण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. विविध रॅली दरम्यान संबंधितांची रस्त्यावरील वागणूक, वेळ व मार्ग निश्चिती, लाऊड स्पिकरची वेळ, ध्वनी तीव्रता, आवाजाची दिशा नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी वाद्य वाजविताना उच न्यायालयाच्या आदेशाने पालन करण्यासाठी मनाई आदेश काढण्यात आले आहेत.

मानवंदनेला सुरुवात ; भिमासैनिकांची उत्साहात हजेरी सुरु

शिक्रापूर : एक जानेवारी या शौर्य दिनी कोरेगाव भीमा येथे असलेल्या ऐतिहासिक विजयरणस्तंभ या ठिकाणी मानवंदना देण्यासाठी देशभरातून अनेक भीमसैनिक येत असून या वर्षी विजयस्तंभावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोसह व संविधान प्रतिमा लावून विशेष सजावट करण्यात आलेली असताना नुकतीच सजावट पूर्ण होऊन येथे मानवंदना देण्यासाठी अनेक भीमसैनिक एक दिवस आधीच परिसरात दाखल झाले असताना पोलिसांचा मोठा फौजफाटा या ठिकाणी दाखल झाला असल्याने विजयस्तंभ परिसर दुमदुमून गेला आहे. कोरेगाव भीमा ता. शिरूर येथे एक जानेवारी २०१८ रोजी शौर्यदिनी झालेल्या हिंसाचारामुळे कोरेगाव भीमा परिसराला वेगळे रूप आलेले होते, त्यांनतर प्रत्येक वर्षी प्रशासनाने योग्य खबरदारी घेतली असताना या वर्षी मोठ्या प्रमाणात भीमसैनिक येथे दाखल होणार असल्याने प्रशासनाने जय्यत तयारी केली.

थोडक्यात

सर्पदंश झालेल्या चिमुकल्याला मिळाले जीवदान

पुणे : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीचा प्रत्यय आला आहे. ६ वर्षीय चिमुकल्याला अतिविषारी नागाने दंश केला. मात्र योग्य सल्ला आणि तत्पर उपचार मिळाल्यामुळे १२ तास बेशुद्ध राहूनही त्याला जीवदान मिळाले आहे.

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे 'देव तारी त्याला कोण मारी' या म्हणीचा प्रत्यय आला आहे. ६ वर्षीय चिमुकल्याला अतिविषारी नागाने दंश केला. मात्र योग्य सल्ला आणि तत्पर उपचार मिळाल्यामुळे १२ तास बेशुद्ध राहूनही त्याला जीवदान मिळाले आहे. अनिरुद्ध मुकेश विश्वकर्मा असे चिमुकल्याचे नाव आहे. यासाठी डॉ. सदानंद राऊत व डॉ. पल्लवी राऊत करत असलेल्या जनजागृती व डॉक्टरांचे प्रशिक्षणामुळे रुग्ण हॉस्पिटलमध्ये वेळेवर पोहचला व त्याचे प्राण वाचण्यासाठी मदत झाली. 'मिशन झिरो स्नेकबाइट डेथ' (शून्य सर्पदंश मृत्युदर प्रकल्प) या उपक्रमांतर्गत खासगी डॉक्टर, शासकीय वैद्यकीय अधिकारी आणि रुग्णवाहिका चालकांना मिळालेले प्रशिक्षण या गंभीर परिस्थितीत अमूल्य ठरले.

भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू

दौंड : दौंड तालुक्यातील पाटस-बारामती श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर वासुंदे हद्दीत स्विफ्ट मोटारीचा भीषण अपघात होऊन दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. अक्षय बाळासाहेब चव्हाण (रा. चिचणी, ता. शिरूर,जि-पुणे), प्रिती विशाल भोसले (रा. पाटस, ता. दौंड, पुणे) असे अपघातात मृत्यू झालेल्या दोघांची नावे आहेत. चालकाचा ताबा सुटल्याने मोटार दुभाजक व नंतर पुलाच्या कठडयाला धडकून हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाटस बारामती पालखी महामार्गाने अक्षय चव्हाण व पाटस येथील प्रिती भोसले हे दोघे सोमवारी साडेबारा वाजता चारचाकी स्विफ्ट मोटारीतून बारामतीला जात होते. वासुंदे गावच्या हद्दीत येताच अक्षय यांचा वाहनावरील ताबा सुटला. यावेळी मोटार रस्त्याच्या दुभाजकाला व नंतर पुलाच्या कठड्याला धडकली. चालक अक्षय व प्रिती गंभीर जखमी झाले. या अपघातात चारचाकीचे मोठे नुकसान झाले. अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. चारचाकीतुन दोघांना तात्काळ बाहेर काढुन दुसऱ्या वाहनातुन उपचारासाठी बारामती येथे पाठविले. मात्र, उपचारापुर्वीच दोघांचा मृत्यू झाला.

सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणातील मोस्ट वॉन्टेड वाल्मिक कराड अखेर पुण्यात सीआयडीसमोर शरण

पुणे / प्रतिनिधी

मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील एक प्रमुख संशयित आरोपी वाल्मिक कराड याला गेले अनेक दिवस पोलीस शोधत होती. शेवटी तो आज सकाळी पुण्यातील सीआयडी कार्यालयात शरण आला. आपण दोषी असेल तर शिक्षा भोगायला तयार असल्याचे त्याने एक व्हिडिओ जारी करीत त्यात सांगितले आहे.

मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील आरोपींच्या शोधासाठी सीआयडीने मोठी कारवाई सुरु केली आहे. सीआयडीची ९ पथके, दीडशेवर पोलीस गेले काही दिवस फरार आरोपींचा शोध घेत आहेत. तरीही एकही आरोपी पोलिसांच्या हाती लागत नव्हता. वाल्मिक कराड याने पुण्यात शरणागती पत्करली, असे वृत्त दोन दिवसांपूर्वी पसरले होते. परंतु, ही अफवा ठरली होती. वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा उजवा हात असल्यानेच शासन त्याला अटक करु शकत नसल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत होता.

शेवटी त्याने सीआयडी समोर आज शरणागती पत्करली. सीआयडीला शरण जाण्यापूर्वी कराडने एक व्हिडिओ जारी केला आहे. यामध्ये त्याने केज पोलीस ठाण्यात खोटी खंडणीची

फिर्याद दाखल केल्याचा आरोप केला आहे. मी सीआयडी ऑफीसमध्ये सरेंडर होत आहे. संतोष देशमुख यांचे जे कोणी मारेकरी असतील त्यांना अटक करावी, फाशी द्यावी, राजकीय द्वेषापोटी माझे नाव त्याच्याशी जोडले जात आहे. पोलीस तपासात जर मी दोषी दिसलो तर न्याय देवता जी शिक्षा देईल, ती भोगायला तयार आहे, असे कराड याने या व्हिडिओ मध्ये म्हटले आहे.

तरसाचा तिघांवर हल्ला; ज्येष्ठ महिला गंभीर जखमी

निरगुडसर / प्रतिनिधी

शेवाळवाडी ता. आंबेगाव येथील सोंडेमळा येथे तरस या वन्य प्राण्याने तिघांवर हल्ला केल्याची घटना घडली.

शेवाळवाडी ता. आंबेगाव येथील सोंडेमळा येथे तरस या वन्य प्राण्याने तिघांवर हल्ला केल्याची घटना सोमवार रोजी दुपारी पाच वाजले च्या दरम्यान घडली असून या घटनेत ज्येष्ठ महिला झुंबर तुकाराम थोरात वय ६५ हि जेष्ठ महीला गंभीर जखमी झाली असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर महिलेचा नातू रोहन विजयकुमार थोरात वय १७, ज्ञानेश्वर रामचंद्र थोरात वय ५४ हे जखमी झाले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून त्यांना घरी सोडले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की शेवाळवाडी सोंडेमळा येथे जेष्ठ महीला झुंबर तुकाराम थोरात, पती तुकाराम श्रीपती थोरात हे ज्येष्ठ दांपत्य राहत असून दुपारी पाच वाजता दरम्यान झुंबर थोरात या घरात काम करत असताना त्यांच्यावर तरसाने अचानक हल्ला केला त्यावेळी झुंबर थोरात आरडाओरडा करत घराच्या बाहेर आल्या घराच्या बाहेर ओट्यावर त्यांचे पती तुकाराम थोरात हे बसले होते.

त्यावेळी तरसाने झुंबर थोरात यांच्यावर जोरदार हल्ला करत त्यांच्या हाताला चावा घेत त्यांना जखमी केले तुकाराम थोरात हे वयोवृद्ध असल्याने त्यांना चालता येत नसल्याने त्यांच्याजवळ असलेल्या वॉकरने त्यांनी तरसाला मारहाण करत पळवून लावण्याचा प्रयत्न केला मात्र तरसाने त्यांच्यावरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी रस्त्याच्या बाजूला त्यांचा नातू रोहन त्यांना वाचवण्यासाठी आला असता तरसाने रोहनच्या हाताला चावा घेत त्याला जखमी केले. तसेच शेजारील ज्ञानेश्वर रामचंद्र थोरात यांच्यावर हल्ला केला असून त्याच्या पायाला दात लागला आहे. त्यानंतर जमलेल्या नागरिकांनी आरडाओरडा केल्याने तरस जवळीलच एका पडक्या घरात घुसला यावेळी स्थानिक नागरिकांनी पडक्या घराचे दरवाजा बंद करून त्याला कोंडून घेतले याबाबत वन विभागाला कळविले असता वनविभागाने अधिकारी रेस्कू टीम सदस्य घटनास्थळी येत घरासमोर पिंजरा लावून तरसाला जेरबंद केले.

कात्रज घाटात गोळीबार, पिस्तुल सापडले !

पुणे / प्रतिनिधी

कात्रज घाटात गोळीबार झाला असून एक तरुण जखमी असल्याचे समजल्यावर पोलीस तातडीने घटनास्थळी पोहचले. त्यांनी तरुणाला रुग्णालयात दाखल केले. दोघा जणांनी आपल्यावर गोळीबार केल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. पोलिसांनी घटनास्थळावर जाऊन पाहणी केली. त्यांना पिस्तुल सापडले.

ग्रामपंचायत वाडेबोल्हाई, ता. हवेली, जि. पुणे
खुली बी-१ निविदा सूचना क्र. ५ सन २०२४-२५

सरपंच, ग्रामपंचायत वाडेबोल्हाई, ता. हवेली, जि. पुणे यांचे वतीने तर्फे जि.प. पुणे नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील सीलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत वाडेबोल्हाई, ता. हवेली जि. पुणे यांच्याकडून दि. ०१/०१/२०२५ ते दि. ०८/०१/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत देण्यात येतील व भरून पाठविलेले मोहरबंद निविदा दि. ०१/०१/२०२५ ते दि. ०८/०१/२०२५ पर्यंत दु. ०४.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत वाडेबोल्हाई, ता. हवेली येथे स्वीकारण्यात येतील. मोहरबंद निविदा दि. ०९/०१/२०२५ रोजी दु. ०४.०० वा. उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम रु.	निविदा फी रु.	ठेकेदार वर्गीकरण	कामाचा कालावधी
१.	मौजे वाडेबोल्हाई येथील पंडित भोर ते साष्टे रोड मुरुमीकरण करणे, ता. हवेली.	२,५६,५९९/-	२३६/-	सु.बे अभियंता	६ महिने

निविदेतील अटी व शर्ती:- १. कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. **२.** कोऱ्या निविदा नमुन्याची फी ग्रामपंचायत वाडेबोल्हाई, ता. हवेली येथे भरून निविदा उपलब्ध होतील. **३.** ठेकेदाराने कोरी निविदा मागणी करताना प्रमाणित नोंदणी दाखला सादर करणे आवश्यक आहे. **४.** सर्व साधारण खुल्या वर्गातील कोऱ्या निविदा रक्कमेच्या १% इसारा रक्कम कोणत्याही बँकेचा डी. डी ग्रामपंचायत वाडेबोल्हाई या नावे असलेला लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. **५.** कोऱ्या निविदांच्या तांत्रिक लिफाफा मध्ये द्यावयाची कागदपत्रे १. निविदा फी पावती, २. नोंदणी प्रमाणपत्र, ३. प्राप्तीकर प्रमाणपत्र, ४ . वस्तू व सेवा कर प्रमाणपत्र.

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत वाडेबोल्हाई ता. हवेली, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत वाडेबोल्हाई ता. हवेली, जि. पुणे

जाहीर निविदा सूचना

सर्व नोंदणीकृत अभियंता व त्या वर्गातील कंत्राटदारांना कळविणेत येते कि बारामती तालुक्यातील मौजे मळद ग्रामपंचायत अंतर्गत खालील ठिकाणी कामे हाती घेणेत आलेली असून सदरची कामे कारणेकामी नमूद केलेल्या वर्गातील कंत्राटदाराकडून बी १ निविदा मागविनेत येत असून सदर काम करणारे त्या वर्गातील कंत्राटदार यांनी सदरच्या निविदा ग्रामपंचायत मळद ता.बारामती,जिल्हा-पुणे,येथे कार्यालयीन वेळेत दिनांक ०१/०१/२०२५ ते ०७/ ०१/२०२५ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात दोन प्रतीत(तांत्रिक व आर्थिक)बंद लिफाफ्यात सादर कराव्यात सदर निविदा दिनांक ०८/ ०१ /२०२५ रोजी सकाळी ११ वाजे नंतर ग्रामपंचायत अधिकारी/सरपंच यांचे समोर ग्रामपंचायत कार्यालयात उघड्नेत येतील कोरे निविदा अर्ज ग्रामपंचायत कार्यालय मळद येथे विहित मुदतीत कार्यालयीन वेळेत प्राप्त करून घ्यावे कोरे अर्ज निविदा फी ग्रामपंचायत मळद PDCC बँक IFSC CODE –HDFC0CPDCCB शाखा बारामती खाते क्रमांक २९२००२५०००००००४९ वर किंवा ग्रामपंचायत मध्ये रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील इसारा रक्कम व कोरे अर्ज निविदा फी जमा केलेली पोहच तांत्रिक लिफाफा मध्ये जमा करावी सुरुवातीला तांत्रिक लिफाफा उघड्नेत येईल व आपली निविदा सर्व नियमास पात्र झालेनंतर आर्थिक लिफाफा उघड्नेत येईल जे ठेकेदार तांत्रिक लिफाफा मध्ये अपात्र होतील त्यांचा आर्थिक लिफाफा उघड्नेत येणार नाही

अ. क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	कोरे अर्ज निविदा फी	इसारा रक्कम	ठेकेदाराचा वर्ग
१	CONSTRUCTING ROAD NIRAWAGAJ ROAD TO SABALE HOME AT MALD TAL BARAMATI DIST PUNE	१९९६३६/-	२३८/-	सूट	सुशिक्षित बेरोजगार अभियंता
२	CONSTRUCTING ROAD BABAN ADAKE HOME TO SURESH ADAKE HOME ROAD AT MALAD TAL BARAMATI DIST PUNE	१९९६३६/-	२३८/-	सूट	सुशिक्षित बेरोजगार अभियंता
३	PROVIDING AND LAYING UNDERGROUND DRAINAGE LINE FOR GP MALAD(BABAN ADAKE GHAR TO SURESH ADAKE GHAR)TAL BARAMATI DIST PUNE	१०९९८१/-	२३८/-	१%	खुली निविदा (वर्ग १ ते ५ करिता)
४	PROVIDING AND LAYING DISTRIBUTION NETWORK AT MALAD (BHAIYAWASTI RAJU JAGTAP GHAR TO RAHUL ATOLE GHAR)TAL BARAMATI DIST PUNE	२०४३८६/-	२३८/-	१%	खुली निविदा (वर्ग १ ते ५ करिता)

आवश्यक कागदपत्रे-
१)नोंदणी प्रमाणपत्र,२)जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र,३)PAN कार्ड ४)मागील तीन आर्थिक वर्षातील ITR,५)कामाच्या अनुभवाचा दाखला
टीप:-, निविदा संबंधातील कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे व इतर सर्व अधिकार सरपंच ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत मळद ता.बारामती,जिल्हा-पुणे.यांनी राखून ठेवले आहेत.

सही/–
ग्रामपंचायत अधिकारी/सरपंच
ग्रामपंचायत मळद ता.बारामती,जि.पुणे.

एल्&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल्&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 00 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: पुणे

L&T Finance

ताबा सूचना
[नियम–8(1)]

जसे की, खालील स्वाक्षरी करणार एल्&टी फायनान्स लिमिटेडचा (आधीचे नाव, एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लि.) अधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस आणि एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम, 2002 [नियम 3] सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम 13(12) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून एक मागणी सूचना जारी केली असून त्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना सदर सूचना मिळाल्यापासून 60 दिवसांचे आत खाली नमूद करण्यात आलेल्या मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम व मागणी सूचनेच्या तारखेपासून ते पैसे भरेपर्यंत/वसूल होईपर्यंत त्यावरील अधिक व्याज आणि इतर शुल्क इतक्या रकमेची परतफेड करण्यास सांगितले होते. कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांनी सदर रकमेची परतफेड न केल्यामुळे ह्याद्वारे कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना आणि सर्वसाधारण जनतेला ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की खालील स्वाक्षरी करणार यांनी ह्या सूचने संदर्भात सदर नियम कमल 8 सोबत वाचले असता सदर कायद्यातील कलम 13 अन्वये त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

कर्ज खाते क्रमांक	कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्सचे नाव	गहाण मालमत्तेचा तपशिल	मागणी सूचना		ताबा घेतल्याची तारीख व प्रकार
			दिनांक	थकित रक्कम (₹)	
H184882306 21112650 / H184882606 21030210	1. राजेश एकनाथ पवार कर्जदार म्हणून आणि 2. अमर एकनाथ पवार, 3. गिरिजा एकनाथ पवार आणि 4. शंकरराव पवार सीट कॉर्नर (तिचे मालक राजेश एकनाथ पवार, अमर एकनाथ पवार, गिरिजा एकनाथ पवार यांच्या मार्फत)	अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे फ्लॅट क्र. 102, अधिमापन सुमारे 133.83 चौरस मीटर म्हणजे 1440 चौरस फूट बांधकाम क्षेत्रफळ, 1ला मजला, इमारतीचे नाव सुख शांती, जिच्यावर बांधली त्या मालमत्तेचा स.क्र. 453/अ-1-3 (जुना स.क्र. 82-अ), सीटीस क्र. 1004, अधिमापन सुमारे 660.54 चौरस मीटर, महसूल गाव नाना पेठ, पुणे, सोबत सामाईक जागेत आणि सुविधांमध्ये अविभाज्य भाग आणि स्वारस्य, जी पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीमध्ये आणि नोंदणी उपजिल्हा तालुका हवेली, पुणे येथील अधिकारक्षेत्रामध्ये आहे.	05.01.2024	02-01-2024 रोजीनुसार रु. 2,17,63,619.15/-	28-12-2024 भौतिक ताबा

कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना खास करून आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार न करण्याची खबरदारीची सूचना देण्यात येत आहे आणि सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास तो एल्&टी फायनान्स लिमिटेड यांना मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम आणि त्यासोबत मागणी सूचनेपासून ते पैसे अदा करेपर्यंत/वसूल होईपर्यंत अधिक व्याज व इतर शुल्क इत्यादी भरण्याच्या अधीन असेल.

स्वाक्षरी/–
अधिकृत अधिकारी
करिता एल्&टी फायनान्स लिमिटेड

दिनांक: 01.01.2025
ठिकाण: पुणे

एल्&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल्&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 00 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: पुणे

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह–कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 28.12.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. चेतन रामचंद्र तिवारी 2. शामादेवी रामचंद्र तिवारी 3. मे. शीतलाप्रसाद एम तिवारी (तिचे मालक चेतन रामचंद्र तिवारी यांच्या मार्फत)	अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : दुकान क्र. 2 अधिमापन सुमारे 210 चौरस फूट म्हणजेच 19.51 चौरस मीटर तळमजला, इमारतीचे नाव ''पार्वती सदन'' विंग ए, जिच्यावर बांधली त्या मालमत्तेचा सीटीएस क्र. 50अ, अधिमापन 237 चौरस मीटर, महसूल गाव एरंडवने, जिल्हा पुणे येथे स्थित, जे पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीमध्ये आणि नोंदणी जिल्हा, उपनिबंधक तालुका, जिल्हा पुणे यांच्या अधिकारक्षेत्रात आहे.	PUNHL18 001231	19 डिसेंबर 2024	रु. 3,36,000	रु. 3,261,319.22/–	रु. 33,60,000	कामकाजाच्या सर्व दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 पूर्वनियोजित भेटीसह.	21.02.2025 रोजी सकाळी 10 ते दुपारी 12.

सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरुन मदतीसह आणि जाहीर ई–लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई–लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई–लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई–लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **20/02/2025** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई–लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी एलटीएफ द्वारे सदर जाहीर ई–लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **21/02/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **22/02/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुर्दीनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे नाव आहे : **शेखर काळे, संपर्क क्र.9823271111, एल अँड टी फायनान्स लि., कार्यालय क्र. 301, 3रा मजला, झेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुलाजवळ, शिवाजी नगर, पुणे – 411005 आणि संतोष तिवारी, संपर्क क्र. 9920490126, एल अँड टी फायनान्स लि. ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400.** ई–लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा ई–लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई–लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई–लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुर्दीनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह–कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

स्वाक्षरी/–
अधिकृत अधिकारी
करिता एल्&टी फायनान्स लिमिटेड

दिनांक: 01.01.2025
ठिकाण: पुणे

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. * व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com